**<u>ठळक बातम्या</u>**

- घरगुती वापराचे सिलिंडर ५० रुपयांनी महाग, उद्यापासून उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना ५५० रुपये, तर इतरांना ८५३ रुपये द्यावे लागणार
- अमेरिकेनं वाढवलेल्या करांमुळं जगभरातल्या शेअर बाजारात हाहाकार, सोनं, चांदी आणि कच्च्या तेलाच्या दरात घसरण
- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची पोर्तुगालचे राष्ट्राध्यक्ष मार्सेलो रेबेलो डी सौसा यांच्याशी चर्चा

**आणि**

- छत्तिसगडमध्ये आज ३१ माओवाद्यांची शरणागती

**<><><><><>**

केंद्र सरकारनं घरगुती वापराच्या एलपीजी सिलिंडरची किंमत ५० रुपयांनी वाढवली आहे. उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना उद्यापासून हे सिलिंडर ५५० रुपयांना तर इतरांना ८५३ रुपयांना मिळतील, अशी माहिती पेट्रोलियम मंत्री हरदीपसिंग पुरी यांनी नवी दिल्लीत वार्ताहरांना दिली.

पेट्रोल आणि डिझेलवरचं उत्पादन शुल्क लिटरमागे २ रुपयांनी वाढवण्याचा निर्णयही केंद्र सरकारनं घेतला आहे. पण त्याची झळ सर्वसामान्य नागरिकांना जाणवणार नाही. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किंमती कमी झाल्या आहेत. त्यामुळे पेट्रोलियम कंपन्यांना स्वस्तात कच्चं तेल मिळत आहे. परिणामी या शुल्कवाढीचा फटका ग्राहकांना जाणवणार नाही, असं पेट्रोलियम मंत्र्यांनी सांगितलं.

<><><><><>

आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर घसरल्याचा फायदा सर्वसामान्य जनतेला करुन द्या, पेट्रोल-डिझेलवरचे कर कमी करुन पेट्रोल ५१ रुपये आणि डिझेल ४१ रुपये प्रति लिटरनं द्या, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत केली. संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या काळात पेट्रोलवर प्रति लिटर साडे ९ रुपये आणि डिझेलवर साडे ३ रुपये उत्पादन शुल्क होतं, राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारनं हा दर वाढवून लिटरमागे ३२ रुपये केल्याचा दावा त्यांनी केला.

डॉ. मनमोहनसिंह प्रधानमंत्री असताना कच्च्या तेलाचे दर १४५ डॉलर प्रति बॅरलवर होते. त्याकाळात पेट्रोल ७० रुपये लिटर, तर डिझेल ४५ रुपये लिटर होते, याकडे त्यांनी लक्ष वेधलं.

<><><><><>

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी विविध देशांवर लादलेल्या करांमुळे जगभरातल्या शेअर बाजारांसह भारतीय बाजारातही आज हाहाकार माजला. गेल्यावर्षी लोकसभा निवडणुकीचे निकाल लागले त्यादिवसानंतरची सर्वात मोठी घसरण आज देशातल्या शेअर बाजारांनी नोंदवली. यामुळे देशातल्या गुंतवणूकदारांचं साडे १३ लाख कोटी रुपयांचं नुकसान झालं.

दिवसअखेर मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स २ हजार २२७ अंकांनी घसरुन ७३ हजार १३८ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ७४३ अंकांची घट नोंदवून २२ हजार १६२ अंकांवर स्थिरावला. सत्रादरम्यान सेन्सेक्स सुमारे ४ हजार आणि निफ्टी सुमारे बाराशे अंकांनी घसरला होता.

त्यामुळं सेन्सेक्स ७२ हजारांच्या खाली, तर निफ्टी २२ हजारांच्या खाली गेला होता. या घसरणीचा सर्वाधिक फटका धातू आणि बांधकाम क्षेत्रातल्या कंपन्यांना जाणवला. माहिती तंत्रज्ञान, बँका, वाहन उद्योग, वित्तीय सेवा क्षेत्रातल्या कंपन्यांचे समभागही आज मोठ्या प्रमाणात घसरले. रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा समितीची बैठक आजपासून मुंबईत सुरू झाली. बुधवारी या बैठकीतले निर्णय जाहीर होतील, त्याकडे शेअर बाजाराचं लक्ष असल्याचं विश्लेषकांनी सांगितलं. जगभरातले इतर शेअर बाजारही आज मोठ्या प्रमाणात घसरले आहेत. अमेरिका, युरोप, जपान, आशियामधल्या निर्देशांकांमध्ये ४ ते ७ टक्के घट दिसून आली.

**<><><><><>**

अमेरिकेनं जाहीर केलेल्या करकपातीमुळं सोनं, चांदीच्या दरातही आज मोठी घसरण झाली. इंडियन बुलियन ज्वेलर्स असोसिएनशननं दिलेल्या दरांनुसार सोनं सुमारे २ हजार रुपये तोळा आणि चांदी अडीच हजार रुपये किलोनं स्वस्त झाली. त्यामुळं २२ कॅरेट सोनं तोळ्यामागे ८९ हजार ५०० रुपये आणि चांदी किलोमागे ९३ हजार १०० रुपये दरानं मिळत होती. आंतरराष्ट्रीय बाजारात सोनं प्रति औंस ३ हजार २०१ डॉलरच्या उच्चांकी पातळीवरुन ३ हजार ६० डॉलर प्रति औंस पर्यंत घसरलं होतं.

कच्च तेल २ पूर्णांक २१ शतांश टक्क्यांनी घसरुन ६४ डॉलर २४ सेंट प्रति डॉलर प्रति बॅरलवर आलं. ट्रम्प यांनी नव्या करांची घोषणा केल्यापासून कच्चं तेल १४ टक्क्यांनी स्वस्त झालंय.

**<><><><><>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी आज अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मारको रुबियो यांच्याशी चर्चा केली आणि भारत- प्रशांत क्षेत्र, भारतीय उपखंड, युरोप, पश्चिम आशिया आणि कॅरेबियन याविषयीच्या परिप्रक्ष्यावर मतांची देवाणघेवाण केली. द्विपक्षीय व्यापार करारावरच्या वाटाघाटी लवकर पूर्ण करण्यावर दोघांचं एकमत झाल्याचं जयशंकर यांनी सांगितलं.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज पोर्तुगालचे राष्ट्राध्यक्ष मार्सेलो रेबेलो डी सौसा यांची भेट घेऊन शिष्टमंडळस्तरीय चर्चा केली. त्यानंतर प्रसिद्ध केलेल्या संयुक्त निवेदनात राष्ट्रपती म्हणाल्या, की भारत आणि पोर्तुगाल दरम्यानचे नाते संबंध ऐतिहासिक असून आता ते अधिक आधुनिक आणि बहुआयामी झाले आहेत. या बैठकी पूर्वी मुर्मू यांनी पोर्तुगालचे राष्ट्रकवी लुई वाझ डी कामोस यांच्या समाधीस्थळी जाऊन आदरांजली वाहिली. पोर्तुगालचे प्रधानमंत्री लुई मॉन्टेनेग्रो आणि संसदेचे सभापती जोस पेद्रो अग्वार ब्रांको यांचीही त्या भेट घेणार आहेत. पोर्तुगालमधल्या भारतीय समुदायाशी मुर्मू संवाद साधतील. भारत – पोर्तुगाल राजनैतिक संबंधांना यंदा ५० वर्ष पूर्ण होत आहेत आणि २७ वर्षांनंतर प्रथमच भारताच्या राष्ट्रपतींनी पोर्तुगालला भेट दिली.

<><><><><>

छत्तिसगडमधल्या दंतेवाडा आणि नारायणपूर जिल्ह्यांमधे मिळून आज ३१ माओवाद्यांनी शरणागती पत्करली. दंतेवाडा जिल्ह्यातून २६ माओवाद्यांनी शरणागती पत्करली, त्यातल्या तीन माओवाद्यांना पकडण्यासाठी पोलिसांनी साडेचार लाखाचं बक्षीस जाहीर केलं होतं.

नारायणपूर जिल्ह्यात पाच महिला माओवाद्यांनी शरणागती पत्करली असून या प्रत्येकीवर एक लाख रूपयांचं बक्षीस होतं. आत्मसमर्पण केल्याबद्दल या माओवाद्यांना प्रत्येकी २५ हजार रुपयांचा धनादेश प्रोत्साहन योजनेनुसार देण्यात आला आहे. त्याचबरोबर नक्षल पुनर्वसन धोरणानुसार त्यांना सगळ्या सोयीसुविधा पुरवल्या जातील.

**<><><><>**

देशाच्या सीमांचं रक्षण करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक देखरेख प्रणाली तैनात करण्यात येत असल्याची माहिती केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिली. शहा तीन दिवसांच्या जम्मू-काश्मीरच्या दौऱ्यावर असून कठुआ इथे असलेल्या विनय या सीमा संरक्षण दलाच्या ठाण्याला आज त्यांनी भेट दिली, त्यावेळी ते बोलत होते.

**<><><><>**

वेव्हज परिषदेच्या माध्यमातून देशात गुंतवणुकीसाठी जगभरातले गुंतवणूकदार भारतात येणार असल्याचं माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. नवी दिल्लीत ते वार्ताहरांशी बोलत होते. डिजिटल इंडियामुळं अनेक तंत्रज्ञान सुलभतेनं देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचलं आहे. त्यामुळं देशात मोठ्या प्रमाणात डिजिटल कंटेटची निर्मिती होत असल्याचं ते म्हणाले. १ ते ४ मे दरम्यान मुंबईत ही परिषद होणार आहे.

**<><><><>**

वक्फ सुधारणा विधेयकाच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर तातडीनं सुनावणी घेण्याबाबत सर्वोच्च न्यायालयानं सहमती दर्शवली आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना यांच्या

अध्यक्षतेखालच्या पीठाने जमियत उलेमा ए हिंदच्या वतीने ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी केलेल्या युक्तिवादाची दखल घेतली, या संदर्भात इतरही अनेक याचिका असून, त्यावर तत्काळ सुनावणी आवश्यक असल्याचं, सिब्बल यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज मुंबईतल्या वानखेडे मैदानावर मुंबई इंडियन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात सामना सुरु आहे आहे. मुंबई इंडियन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या १३ षटकात २ बाद १२३ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//